☎ (0253) 2959606
ईमेल:
ddcahnashik@gmail.com

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नाशिक-०२ यांचे कार्यालय**
अशोक स्तंभाजवळ, गंगापूर रोड, पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय आवार,
नाशिक -४२२००२
District Deputy Commissioner of Animal Husbandry, District
Nashik, Near Ashokstambh, Gangapur Road, Nashik - 422002

जा.क्र.जिपउआ/जिकृरेकें/ १००८ /२०२१,नाशिक,-०२ दिनांक- २३/०२/२०२१

# जाहीर लिलाव

निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करणा-या इच्छुक व्यक्ती/कंपन्या/खरेदीदार यांना सुचना देण्यात येते की,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नाशिक जि-नाशिक या कार्यालयांतर्गत निरुपयोगी,निर्लेखित केलेली खालीलप्रमाणे विविध साईझची द्रवनत्र पात्रे जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहेत. सदर द्रवनत्र पात्रे इच्छुकांना ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | लिलावाचा दिनांक | द्रवनत्र पात्राचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| १. | | TA-55 | १३८ |
| २. | | TA-60 | ७ |
| ३. | | IN-50 | ५९ |
| ४. | | LAB-50 | ४ |
| ५. | | BA-35 | १ |
| ६. | **१२ मार्च २०२१** | BA-20 | ३ |
| ७. | | BA-5 | ४ |
| ८. | | IR-3 | ४६ |
| ९. | | BA-3 | १२५ |
| १०. | | MINIWONDER | ५४ |
| ११. | | CHALANGER | ३ |
| | | एकुण | ४४४ |

त्याकरिता दिनांक **१२ मार्च २०२१** रोजी सकाळी **११.००** वाजता जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,नाशिक येथे जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या संस्था/कंपन्या व्यापारी यांना निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करायची असतील अश्या संस्था/ कंपन्या/ व्यक्तींनीच भाग घ्यावा.भाग घेण्यासाठी इच्छुकांनी **जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,नाशिक** यांचे नावे **रु. १०,०००/-** चा धनाकर्ष पेयेबल ॲट नाशिक सादर करणे आवश्यक आहे. जाहीर लिलावासाठी गठीत जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम असेल. लिलावानंतर विक्री करावयाची सर्व द्रवनत्र पात्रे ही यशस्वी लिलावधारकास स्वत: चेपुन घेवुन मगच हस्तांतरित करण्यात येतील जेणेकरुन त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
नाशिक

प्रत

१. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नाशिक येथील नोटीस बोर्डवर लावणेसाठी
२. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,नाशिक येथील नोटीस बोर्डवर लावणेसाठी
३. अधिक माहिती पशुसंवर्धन खात्याच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. (ahd.maharashtra.gov.in)

☎ (0253) 2959606
ईमेल:
ddcahnashik@gmail.com

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नाशिक-०२ यांचे कार्यालय**
अशोक स्तंभाजवळ, गंगापूर रोड, पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय आवार, नाशिक -४२२००२
District Deputy Commissioner of Animal Husbandry, District Nashik,
Near Ashokstambh,Gangapur Road, Nashik - 422002

जा.क्र.जिपउआ/जिकृरेकें/ ९००४ /२०२१,नाशिक,-०२ दिनांक- २३/०२/२०२१

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नाशिक या कार्यालयातील भांडारातील निरूपयोगी जडसंग्रह वस्तुंचा लिलाव दिनांक १२ मार्च २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता**

## अटी व शर्ती

१. भाग घेणा-यास अनामत रक्कम रुपये १०,०००/- धनाकर्षाच्या स्वरुपात **जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,नाशिक** या नावे भरावी लागेल.

२. सदरची रक्कम अयशस्वी लिलाव धारकास लिलाव पुर्ण होताच परत करण्यात येईल.

३. यशस्वी लिलाव धारकास अनामत रक्कम लिलावाची रक्कम पुर्ण भरल्यानंतर परत करण्यात येईल.

४. लिलाव तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.सर्व वस्तुंची मिळुन बोली बोलावी लागेल.विशिष्ट वस्तुसाठी बोली बोलता येणार नाही.

५. लिलावामध्ये ज्या बोली धारकाची बोली सर्वाधिक असेल त्याच्याच नावाने लिलाव तीन वेळा बोली पुकारून लिलावास अंतिम मंजुरी देण्यात येईल.

६. अंतिम लिलाव ज्यांचे नावे मंजुर होईल त्या व्यक्तीने /संस्थेने लिलावाची संपुर्ण रक्कम कार्यालयाच्या खालील बँक खात्यात आरटीजीएस अथवा धनाकर्षाद्वारे जमा करावी. रक्कम भरावयाच्या खात्याचा तपशील खालीलप्रमाणे- जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नाशिक यांचे या नावे असलेले
**खाते क्र.11291931285 आयएफ़एससी कोड- SBIN0000437**

६.A) पुर्ण रक्कम सात दिवसांच्या आत जमा न केल्यास त्या व्यक्तीची किंवा संस्थेची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल.

७. अंतिम लिलाव ज्यांचे नावे मंजुर होईल त्यांनी लिलावातील संपुर्ण वस्तुंची वाहतुक स्वतःचे वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे.या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे वाहन, हमाल, मदतनीस मिळणार नाही. तसेच लिलाव अंतिम झालेल्या वेळेपासुन मालाची प्रत्यक्ष वाहतुक करेपर्यंत लिलावाच्या वस्तुंचे संरक्षण, बोली धारकाने स्वतःकरावयाचे आहे.या कालावधीत लिलावातील कोणतीही वस्तु गहाळ झालेस या कार्यालयावर जबाबदारी राहणार नाही.

८. लिलावामध्ये समाविष्ट असेलेल्या वस्तु जशा आहेत तशाच व यथास्थिती घ्याव्या लागतील.लिलावाच्या वस्तु अगोदरच पाहुन घ्याव्यात नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

९. लिलावात सहभागी होणा-याने अथवा प्रतिनिधी पाठवल्यास लिलाव धारकाने पॉवर ऑफ अँटर्नी आणि स्वतः असल्यास वास्तव्याबाबत पुरावा म्हणून ओळखपत्र,त्यांचा पत्ता या पृष्ठयर्थ कागदपत्रे सादर करावे लागतील.उदा. आधारकार्ड/रेशनकार्ड/घरटॅक्स पावती/पॅन कार्ड **किंवा टॅन नंबर/विक्री प्रमाणपत्र** विद्युत बिल/टेलीफोनबिल/निवडणूक ओळखपत्र यापैकी एक दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.तसेच खरेदीदारांनी त्यांचा टॅन नंबर व पॅन नंबरची प्रत सादर करावी.

१०. लिलावास अंतिम मंजुरी देणे अथवा लिलाव नाकारणे, स्थगित करण्याचा किंवा लिलाव प्रक्रीया रद्द करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल व तो सर्व बोलीधारकांस बंधनकारक असेल.

११. लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणत्याही प्रकारचा वाद उद्‌भवल्यास या बाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोली धारकांस तो बंधनकारक राहील.

१२. यशस्वी लिलावधारकाने सर्व साहित्य (विक्री करावयाची सर्व द्रवनत्र पात्रे) स्वखर्चाने चेपुन घेतल्यानंतर मगच हस्तांतरित करण्यात येतील जेणेकरुन त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.

१३. वरील अटी व शर्ती मंजुर असणा-या खरेदीदारालाच लिलावात भाग घेता येईल.

डॉ. बी.आर.नरवाडे
अध्यक्ष, लिलाव समिती
तथा
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ,नाशिक